# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंध सादर करताना मला कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे. प्रस्तुत प्रबंधासाठी मी जरी प्रयत्न व परिश्रम घेतले असले तरी ते सार्थकी लावण्याचे श्रेय माझ्या मार्गदर्शिका डॉ. एन. आर. सप्रे, अधिव्याख्याता, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनाच दिले पाहिजे. त्यांच्या समर्थ व सकस मार्गदर्शनामुळे माझ्या प्रयत्नाला व परिश्रमाला योग्य दिशा व प्रेरणा मिळाली.

दैनंदिन कामाचा व्याप सांभाळून स्वतःचा मौलिक वेळ माझ्यासाठी खर्च करून त्यांनी अत्यंत अगत्यपूर्वक मार्गदर्शन केले. त्यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करू शकले. माझ्या प्रयत्नाला पूर्णपणे मार्गदर्शन, सहकार्य, सदिच्छा देणा-या गुरूवर्यांची मी सदैव ऋणी राहीन.

प्रस्तुत शोधप्रबंधाचे काम करताना आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी संशोधन कार्यात मदत करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. सीमा येवले, तसेच डॉ. एम्. एस्. पद्मिनी, डॉ. गीतांजली पाटील, डॉ. पी. एस. पाटणकर या सर्वांची मी आभारी आहे.

संशोधनासाठी सामग्री गोळा करण्याच्या हेतूने ज्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना भेटी दिल्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मला योग्य ते सहकार्य केले तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्राध्यापकांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांची मी आभारी आहे. संशोधन साधननिर्मिती प्रक्रियेत तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचीही आभारी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाकरीता आवश्यक असणारे अभ्यासक्रम व माहिती उपलब्ध करून शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल तसेच विविध शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथपाल यांची मी विशेष आभारी आहे.

संदर्भ ग्रंथ सूचीत निर्देश केलेल्या लेखनाचा संशोधन कार्यासाठी खूपच उपयोग झाला. त्या सर्व लेखकांची मी आभारी आहे.

सदर संशोधनास सतत प्रेरणा देणारे, आग्रह धरणारे माझे पती, मला आपल्या परीने सहकार्य करणारा माझा मुलगा तसेच इतर कुटुंबिय यांचे औपचारिकपणे ऋण व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणेच मी अधिक भाग्याचे ठरेल.

सदरच्या शोधप्रबंधाचे टंकलेखन, झेरॉक्सिंग व बायडींगचे काम अत्यंत उत्कृष्टपणे व कमीत कमी वेळात पूर्ण केल्याबद्दल प्राजक्ता टायपिंग ॲण्ड झेरॉक्सिंग सेंटर, कोल्हापूरच्या सौ. सुषमा संजय पसारे व परिवार यांचीही मी आभारी आहे.

शिवाय ज्या ज्या ज्ञात-अज्ञात व्यक्तिंनी, मित्रांनी व मैत्रिणींनी प्रस्तुत संशोधन कार्यास सहकार्य करून सद्भावना दिल्या त्या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

कोल्हापूर ~~सोलापूर~~

**सौ. कोमल संजय पाटील**

दिनांक : 30.12.2006